# यंदा नऊ हजार कोटींचे 'आयपीओ'

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

व्यवसायाच्या विस्तारासाठी निधी उपलब्ध करणे, खेळत्या भांडवलाची गरज पूर्ण करणे आणि कर्जाची परतफेड करणे या प्रमुख कारणांनी चालू आर्थिक वर्षात विविध कंपन्या 'प्रारंभी समभाग विक्री' (आयपीओ) करणार असून यामार्फत त्या तब्बल नऊ हजार कोटी रुपये उभारणार आहेत. कॅथलिक सिरियन बँक, एजीएस ट्रॅन्झॅक्ट टेक्नालॉजिज, श्री पुष्कर केमिकल्स अँड फर्टिलायझर्स, दिलीप बिल्डकॉन, एस. एच. केळकर अँड कंपनी, अमर उजाला या कंपन्या येत्या काही महिन्यांत शेअर्सची विक्री करणार आहेत.

तज्ज्ञांच्या मते, गेल्या दोन महिन्यांत अनेक कंपन्यांनी 'प्रारंभी समभाग विक्री' (आयपीओ) करण्यासाठी मंजुरी मिळण्याबाबत भांडवल बाजार नियामक 'सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया'कडे (सेबी) प्रस्ताव दाखल केले आहेत. यामुळे चालू आर्थिक वर्षात या क्षेत्रांत मोठी उलाढाल होण्याची शक्यता आहे. ११ कंपन्यांनी ५ हजार १० कोटी रुपये उभारण्यासाठी नियोजन केले आहे आणि त्यासाठी 'सेबी'कडून मंजुरी घेतली आहे. आणखी ११ कंपन्यांनी ३ हजार ६०२ कोटी रुपयांसाठीच्या शेअरविक्रीचे प्रस्ताव आखले आहेत आणि मंजुरी घेण्यासाठी ते 'सेबी'कडे पाठवले आहेत.

आयनॉक्स विंड, अॅडलॅब्ज एन्टरटेन्मेंट आणि ऑर्टेल कम्युनिकेशन्स या तीन कंपन्यांचे 'आयपीओ' गेल्या महिन्यात झाले. नुकत्याच संपलेल्या २०१४-१५ आर्थिक वर्षात आयपीओमार्फत २ हजार ७६० कोटी रुपयांचा निधी उभारण्यात आला. २०१३-१४ आर्थिक वर्षाच्या तुलनेत हे प्रमाण ९१९ कोटी रुपयांनी अधिक होते. गेल्या आर्थिक वर्षातही आयपीओ क्षेत्रात अनेक घडामोडी झाल्या लहान व मध्यम कंपन्यांनी (एसएमई) अंदाजे ३८ आयपीओ जाहीर केले आणि त्यातून २५० कोटी रुपये उभारले.

रास्त आणि आकर्षक किंमत जाहीर करणाऱ्या आयपीओंना गुंतवणूकदारांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळेल, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.